**प्रेसनोट**

दि.०४/०२/२०२२

## वडगांव मावळ पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथील पोलीस हवालदारावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | वडगांव मावळ पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण, गु.र.नं. २८/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३२ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - संतोष पांडुरंग माने, वय - ४५ वर्षे<br>पद – पोलीस हवालदार,<br>नेमणुक - वडगांव मावळ पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- ( दहा हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ३,०००/- (तीन हजार रूपये) |

पडताळणी व सापळा दिनांक :- ०३/०२/२०२२.
ठिकाण:- वडगांव मावळ पोलीस स्टेशन.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदारांच्या पत्नीचे तक्रारीवरून वडगांव मावळ पोलीस स्टेशन येथे तक्रारदारांवर अदखलपात्र गुन्हा दाखल आहे. या गुन्हयाच्या अनुषंगाने कारवाई न करण्यासाठी लोकसेवक पोलीस हवालदार माने यानी १० हजार रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदारांच्या पत्नीच्या तक्रारीवरून दाखल असलेल्या गुन्हयाच्या अनुषंगाने तक्रारदारांवर कारवाई न करण्यासाठी आरोपी लोकसेवक यानी तडजोडीअंती ३ हजार रूपये लाच मागणी करून स्वीकारली म्हणून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस उप अधीक्षक शितल घोगरे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे व श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.

Scanned with CamScanner